# राष्ट्रीय प्रजनन आरोग्य संशोधन संस्था परळ, मुंबई

(भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद) व

# बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई

यांचा संयुक्त उपक्रम

***" लैंगिक संबंधातून पसरणारे संसर्ग व गर्भाशयमुखाचा कर्करोग याविषयी मुंबई शहरातील झोपडपट्ट्यांमधील जोडप्यांचे ज्ञान वाढविण्याच्या व आरोग्य सेवा प्राप्त करण्यासंबंधीत वर्तनाचा विकास करण्याच्या दृष्टिने करण्यात येणारा अभ्यास "***

## प्रजनन मार्ग लैंगिक संबंधातून पसरणारे आजार

## (आर.टी.आय् / एस.टी.आय्)

***प्रजनन मार्ग व लैंगिक संबंधातून पसरणाऱ्या आजारांविषयी पुरुषांकरिता संदेश***

१. प्रजनन मार्गाचे आजार आणि लैंगिक आजार या विषयी योग्य माहीती मिळविण्याकरिता जवळच्या आरोग्य केंद्रास भेट द्या किंवा डॉक्टरांशी संपर्क साधा.

२. जर आपणांस किंवा आपल्या पत्नीला लैंगिक आजार झालेला असेल तर आपली व आपल्या पत्नीची तपासणी करून उपचार करून घ्या. जेणेकरून पुर्न:संसर्ग टाळता येईल.

३. लैंगिक आजाराचा संसर्ग टाळण्याकरिता निरोधचा वापर करा. शंका असल्यास समुपदेशकाला भेटा व चर्चा करा.

४. लैंगिक आजार झालेल्या व्यक्तींना एच.आय.व्ही. ची बाधा होण्याचा जास्त संभव असतो.

५. प्रजनन मार्गाचे आजार आणि लैंगिक आजाराविषयी चर्चा करण्यास लाजू नका किंवा भिती बाळगू नका.

***प्रजनन मार्गाचे आजार म्हणजे काय?***

प्रजनन मार्गाचे आजार हे एक प्रकारचे लैंगिक आजारच आहेत. या आजारामध्ये गर्भाशय, गर्भनलिका, योनीचे बाहयांग, योनी, गर्भाशयाचे तोंड, अंडाशय हे स्त्रीयांमधील अवयव बाधीत होत असतात. ओटीपोटावरील सुज अर्थात पेल्व्हीक इनफ्लामेटरी डिसीज, (PID) म्हणजेच बिजांडकोष, बीजवाहक नलिका, गर्भाशय मुख आणि गर्भाशय या सारख्या प्रजनन संस्थेच्या विभिन्न अवयवांना झालेला जंतुसंसर्ग हा सुध्दा एक प्रजनन मार्गाचा आजार आहे. ज्यामुळे वंध्यत्व येऊ शकते किंवा जन्माला येणाऱ्या बाळास त्याचा संसर्ग होऊ शकतो.

***प्रजनन मार्गातील आजाराचे मुख्यत्वे तीन प्रकार आहेत.***

| | |
|---|---|
| अ. बाह्यांगावर दिसणारे आजार | - प्रजनन अवयवांवर आढळून येणारी वाढ |
| ब. आंतरीक आजार | - वैद्यकिय प्रक्रियेमुळे होणारे आजार |
| क. लैंगिक संबंधातून पसरणारे आजार | - संभोगाद्वारे पसरणारे आजार |

***लैंगिक संबंधातून पसरणारे आजार म्हणजे काय?***

व्यक्ती-व्यक्ती मधील लैंगिक संबंधाद्वारे होणाऱ्या जंतुसंसर्गामुळे जे संसर्गिक आजार होतात त्यांना लैंगिक आजार म्हणतात. हा आजार अतिसुक्ष्म जंतुमुळे होतो. या जंतुना विषाणु किंवा जीवाणु म्हणतात. वेगवेगळ्या जीवाणु किंवा विषाणुमुळे वेगवेगळ्या प्रकारचे लैंगिक आजार होतात. एकापेक्षा जास्त व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवणाऱ्या व्यक्तीला तसेच लैंगिक आजार असलेल्या बाधित व्यक्तीबरोबर संबंध ठेवणाऱ्या निरोगी व्यक्तीला या रोगाचा संसर्ग होण्याचा जास्त धोका

असतो. काहीही लक्षणे न दिसल्यामुळे इलाज न झालेले आजार काही वेळा तांबी बसवल्यानंतर बळावतात. तसेच गरोदरपणात अशी लक्षणे न दिसलेल्या आजारांमुळे गर्भास संसर्ग होऊ शकतो व अशा संसर्गामुळे गर्भशयाचा कॅन्सरही होऊ शकतो.

| लैंगिक आजाराची पुरुषांमध्ये आढळणारी लक्षणे | लैंगिक आजाराची स्त्रियांमध्ये आढळणारी लक्षणे |
|---|---|
| १. लिंगावर पुरळ व फोड येणे<br>२. लिंगातून पिवळसर स्त्राव किंवा पू येणे<br>३. लिंगावर सुज किंवा लिंगाच्या आजुबाजुला जांघेत गाठ येणे<br>४. लिंगाला खाज येणे किंवा लैंगिक संबधाच्या वेळेस दुखणे<br>५. लघवी करताना जळजळ होणे<br>६. तोंडामध्ये फोड, जखमा, जळजळ किंवा त्वचा लालसर होणे | १. योनीतून दुर्गंधीयुक्त स्त्राव येणे<br>२. ओटीपोटात दुखणे<br>३. योनीमध्ये खाज येणे किंवा संबंधाच्या वेळेस दुखणे<br>४. योनीमार्गात लालसर फोड किंवा पुरळ येणे<br>५. योनीवर किंवा आजुबाजूला जांघेत गाठ येणे<br>६. लघवी करताना जळजळ होणे<br>७. तोंडामध्ये फोड, जखमा, जळजळ किंवा त्वचा लालसर होणे |

*प्रजनन मार्ग व लैंगिक संबंधातून पसरणाऱ्या आजारांचा प्रतिबंध कसा कराल?*

१. आपल्या गुप्तांगाची नियमित स्वच्छता राखा.

२. आपल्या जोडीदाराशी एकनिष्ठ रहा.

३. आपणांस किंवा आपल्या जोडीदारास लैंगिक आजार झालेला असेल तर लैंगिक संबंधाच्या वेळेस निरोध वापरा.

४. आपल्या जोडीदाराचा देखील योग्य उपचार करून घ्या.

५. योग्य मार्गदर्शनाकरिता समुपदेशकाला भेटा.

*प्रजनन मार्ग व लैंगिक संबंधातून पसरणाऱ्या आजारांच्या उपचाराविषयी*

- प्रजनन मार्गाचे आजार/लैंगिक आजार पुर्णपणे बरे करण्यासाठी तज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार उपचार करावा.
- आपण पुर्णपणे बरे झालो आहोत याची खात्री करून घेण्यासाठी डॉक्टरांची पुन्हा भेट घ्या.
- आजाराची लक्षणे पुर्णपणे बरी झाली तरी डॉक्टरांनी दिलेली औषधे मध्येच बंद करू नयेत.
- गर्भवती स्त्रीला असा आजार झाल्यास गर्भाची तपासणी जरूर करून घ्यावी.

*उपचार न केल्यास काय होऊ शकते?*

| पुरुषांमध्ये | स्त्रियांमध्ये | स्त्री व पुरुष दोघांमध्ये |
|---|---|---|
| ▪ मुत्रमार्ग आकसल्याने लघवी करताना अडचण जाणवते.<br>▪ आरोग्यावर अतिशय गंभीर स्वरूपाचे परिणाम होतात. | ▪ ओटीपोटावर सूज येते.<br>▪ सारखे सारखे गर्भपात होतात<br>▪ गर्भाशयाच्या आजुबाजुला सुज येते<br>▪ गरोदर स्त्रीच्या गर्भाला विकलांगता येऊ शकते. | ▪ वंध्यत्व येते.<br>▪ लैंगिक आजार झालेल्या असल्यास एच्.आय्.व्ही.ची बाधा होण्याची जोखिम ५ ते २० टक्क्यांनी जास्त असते. |

*नवजात बालक व गुप्तरोग*

- गर्भवती स्त्रीला लैंगिक आजार झालेला असेल तर तिच्या होणाऱ्या बाळासही हा आजार होऊ शकतो. तसेच त्याचा होणाऱ्या बाळाच्या आरोग्यावरही कायम स्वरूपी परिणाम होऊ शकतो.
- गर्भवती स्त्रीने लैंगिक आजारावर उपचार करवून न घेतल्यास जन्माला येणारे मुल जन्मत:च अपंग आजारी असू शकते. तसेच गर्भपात होण्याची किंवा मृत बालक जन्मास येण्याची शक्यता असते.

*लैंगिक आजार व त्यांची लक्षणे*

| | |
|---|---|
| १.परमा (गोन्होरिया): | • पुरुषांमध्ये लिंगामधून दुर्गंधीयुक्त स्त्राव किंवा पू येणे<br>• स्त्रियांमध्ये योनीमार्गातून दुर्गंधीयुक्त स्त्राव येणे<br>• लघवी करतांना जळजळ व दुर्गंधीयुक्त स्त्राव येणे |
| २.ट्रायकोमोनस व्हजायनाबटीस: | • स्त्रियांच्या योनीमार्गातून दुर्गंधीयुक्त स्त्राव येणे<br>• स्त्रियांमध्ये अनियमित मासिक स्त्राव<br>• स्त्रियांमध्ये योनीला खाज येणे<br>• स्त्रियांमध्ये लैंगिक संबंधाच्या वेळेस दुखणे |
| ३.गरमी (सिफिलिस): | • पुरुषांमध्ये लिंगावर, अंडकोषवर किंवा गुदद्वारावर जखम, पुरळ तथा पू युक्त फोड येणे<br>• स्त्रियांमध्ये योनीमध्ये/योनीवर गुदद्वारावर जखम होणे<br>• एक किंवा त्यापेक्षा अधिक दुखणारी अथवा न दुखणारी गाठ येणे<br>• लिंगावर अथवा आजुबाजुला येत जात राहणारी सुज |
| ४.मृदव्रण: | • स्त्रियांमध्ये ओटीपोटात दुखणे<br>• स्त्रियांमध्ये योनीमध्ये/योनीवर गाठी, पुरळ तथा पू युक्त फोड येणे<br>• पुरुषांमध्ये लिंगावर एक किंवा त्यापेक्षा अधिक दुखणाऱ्या जखमा<br>• पुरुषांमध्ये लिंगावर अथवा आजुबाजुला सतत येणारी सुज |
| ५.चामखिळी: | • लिंगाच्या चामडीवर अतिरिक्त मासाची वाढ होणे<br>• पुरुषांमध्ये लिंगावर अथवा लिंगाजवळ गाठ येणे<br>• पुरुषांमध्ये लिंगामधून सतत रक्तस्त्राव होणे |
| ६.कोंडीलोमा लॅटा: | • गुदद्वारामध्ये - जखम होणे, भेगा पडणे, लालसर होणे, रक्त येणे, खाज येणे, चट्टे येणे |
| ७.ल्युकोप्लाकिया: | • तोंडामध्ये - डाग पडणे, जखमा होणे, भेगा पडणे, लालसर होणे, रक्त येणे, खाज येणे, सुजणे, उंचवटा येणे |
| ८. मोनिलियासीस: | • स्त्रियांमध्ये योनीमार्गातून दुर्गंधीयुक्त स्त्राव येणे<br>• स्त्रियांमधील अनियमित मासिक स्त्राव<br>• स्त्रियांमध्ये योनीला खाज येणे<br>• स्त्रियांमध्ये लैंगिक संबंधाच्या वेळेस दुखणे |

*लैंगिक संबंधातून पसरणाऱ्या आजाराविषयी समाजात खालील गैरसमज आहेत*

१. तेल, पेट्रोल, सोडा, लिंबू वापरून लैंगिक अवयव धुतल्याने लैंगिक आजार बरे होतात.
२. लहान बालकांबरोबर किंवा प्राण्यांबरोबर लैंगिक संबंध ठेवल्याने हा आजार बरा होतो.
३. हकीम, भगत यांच्याकडून उपचार घेतल्यामुळे हे आजार बरे होतात.

*लक्षात ठेवा, हे सर्व लैंगिक संबंधातून पसरणाऱ्या आजारांविषयी गैरसमज आहेत*

*परंतू सत्य हे आहे की.....*

१. लैंगिक अवयव तेल, पेट्रोल, सोडा, लिंबू वापरून धुतले तर लैंगिक आजार बरे होत नाहीत तर आरोग्यावर त्याचे गंभीर स्वरूपाचे परिणाम होऊ शकतात.

२. लहान बालकांबरोबर किंवा प्राण्यांबरोबर लैंगिक संबध ठेवल्याने लैंगिक आजार बरा होत नाही. तर बेकायदा कृत्य केल्यामुळे तुरुंगवास होऊ शकतो.

३. हकीम, भगत यांच्याकडून उपचार घेतल्यामुळे लैंगिक आजार बरे होत नाहीत तर योग्य उपचार न झाल्यामुळे आरोग्यावर त्याचे गंभीर स्वरूपाचे परिणाम होऊ शकतात.

*आपल्या माहिती करिता*

**राष्ट्रीय प्रजनन आरोग्य संशोधन संस्था आणि बृहन्मुंबई महानगर पालिका यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रसूतिगृह, टागोर नगर नंबर-७, विक्रोळी (पूर्व) येथे प्रत्येक महिन्याच्या चौथ्या गुरूवारी सकाळी १०.०० ते दुपारी १.०० या वेळेत पॅप स्मिअर परिक्षण शिबिर आयोजित करण्यात येते. या दिवशी ही तपासणी मोफत करण्यात येते. सर्व महिलांनी या शिबिराचा लाभ अवश्य घ्यावा. आपण सुध्दा आपल्या परिवारातील लग्न झालेल्या सर्व महिलांची पॅप स्मिअर तपासणी जरूर करून घ्या आणि कर्करोगापासून दूर रहा.**

*पॅप स्मिअर चाचणी म्हणजे काय ?*

कर्करोगासारख्या जीवघेण्या आजाराची लक्षणे सुरूवातीला दिसत नाहीत तसेच काही लैंगिक आजाराचीही लक्षणे सुरुवातीच्या काळात दिसत नाहीत. परंतू पॅप स्मिअर या चाचणीमुळे प्राथमिक अवस्थेतच या आजारांचे निदान करता येते. पॅप स्मिअर चाचणीमुळे कर्करोग व कर्करोगाच्या प्राथमिक अवस्थेतील बदल तसेच जंतुसंसर्गामुळे होणाऱ्या लैंगिक आजाराचे निदान करता येते. लग्न झालेल्या १८ ते ४५ या वयोगटातील प्रत्येक स्त्रीने ही तपासणी निदान दोन वर्षातून एकदा तरी करवून घेणे गरजेचे आहे.

*पॅप स्मिअर चाचणी कशी करतात ?*

पॅप स्मिअर ही चाचणी सोपी व बेदनारहित आहे. कापसाच्या किंवा ब्रशाच्या सहाय्याने स्त्रीच्या योनी मार्गातून गर्भाशयमुखावरील स्त्राव घेऊन तो काचपट्टीवर पसरविला जातो. प्रयोगशाळेमध्ये यावर विशेष रासायनिक प्रक्रिया करून सुक्ष्मदर्शक यंत्राद्वारे परिक्षण केले जाते. ही एक सहज करता येणारी चाचणी आहे, ऑपरेशन नाही. ही चाचणी करताना स्त्रियांना काहीही त्रास होत नाही व या चाचणीकरीता फक्त तीन मिनीटे एवढाच कालावधी लागतो. मासिक पाळीच्या दिवसांव्यतिरिक्त ही चाचणी केव्हाही करता येते.

*पॅप स्मिअर चाचणीचे फायदे*

- नियमित पॅप स्मिअर चाचणी करून घेतल्याने कर्करोगाच्या प्राथमिक लक्षणांचे निदान होऊन त्यामुळे होणारा त्रास व अकाली येणारा मृत्यू टाळता येतो.
- पॅप स्मिअर चाचणीमुळे लैंगिक आजाराचे निदानही करता येत असल्यामुळे त्यावर त्वरित उपचार करून भविष्यात होणारे गंभीर परिणाम टाळता येतात.